मुं. गृ. नि. व क्षे. वि. मंडळ
आवक क्र. EC-4124
दिनांक 06/06/2022

वरळी, ना.म. जोशी मार्ग व नायगांव येथील
<u>बी.डी.डी. चाळींचे नामकरण करण्याबाबत.</u>

महाराष्ट्र शासन
गृहनिर्माण विभाग,
**शासन निर्णय, क्रमांक:-संकीर्ण-२०२२/प्र.क्र.१२६/गृनिप**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक:- ३ जून, २०२२

आवक क्र. : अगे-4124
दिनांक : 13/06/2022
उपमुख्य.अ. / बीडीडी/मुं.मं.

<u>वाचा</u> :- शासन निर्णय, गृहनिर्माण विभाग, क्रमांक : विविचा-२००७/प्र.क्र.५१ (भाग-१)/गृनिप, दि.३०.०३.२०१६

<u>प्रस्तावना</u> :-

तत्कालीन मुंबई विकास विभागाने (बी.डी.डी.) सन १९२१-१९२५ च्या दरम्यान मुंबईतील वरळी, ना.म.जोशी मार्ग, नायगांव व शिवडी येथे एकूण २०७ चाळी बांधलेल्या आहेत. प्रत्येक चाळ ही तळ + ३ मजल्यांची असून, त्यात प्रत्येकी ८० प्रमाणे रहिवाशी गाळे आहेत. तसेच या बी.डी.डी. चाळींच्या परिसरात झोपडपट्टीसदृश्य बांधकामे स्टॉल्स, दुकाने, सामाजिक / शैक्षणिक संस्था देखील आहेत. सदर बी.डी.डी. चाळी जवळपास ९६ वर्षांपेक्षा जास्त जुन्या झालेल्या असल्याने, त्यांचा पुनर्विकास करण्याचा निर्णय शासनाने मंत्रिमंडळाच्या मान्यतेने घेतलेला आहे व तसे आदेश वाचा येथील दि. ३०.०३.२०१६ च्या शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात आलेले आहेत. पुनर्विकास होत असलेल्या बी.डी.डी. चाळींचे नामकरण करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यास अनुसरुन शासन खालील प्रमाणे निर्णय घेत आहे:-

BDD/MB

<u>शासन निर्णय</u> :-

वरळी, ना.म.जोशी मार्ग व नायगांव येथील बी.डी.डी. चाळींच्या पुनर्विकासाची कामे सध्या प्रगतीत आहेत. सन १९२१-१९२५ च्या दरम्यान तत्कालीन मुंबई विकास विभागाने (Bombay Development Department) या चाळी बांधलेल्या असल्याने, त्या बी.डी.डी. चाळी म्हणून ओळखल्या जातात. या चाळींचा पुनर्विकास होत असल्याने या चाळींचे नामकरण करण्याचे मा.मंत्री (गृहनिर्माण) यांनी सन २०२२ च्या विधीमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात विधानसभेत जाहीर केलेले आहे. त्यानुसार उपरोक्त बी.डी.डी. चाळींचे पुढील प्रमाणे नामकरण करण्यात येत आहे :-

१) बी.डी.डी. चाळ, वरळी - स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे नगर
२) बी.डी.डी. चाळ, ना.म. जोशी मार्ग - स्वर्गीय राजीव गांधी नगर
३) बी.डी.डी. चाळ, नायगांव - श्री.शरद पवार नगर

CO/MB

PA: Circulate 15/6.

No/Dy.CE/BDD/MB/ 113 /2022
Date :- 17 JUN 2022
Forwarded to Executive Engineer, Worli/Naigaon/N.M.Joshi BDD/MB for information & necessary action.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून, त्याचा संगणक संकेताक २०२२०६०३१०५७०८०७०९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Arvind Tulshiram Shete

Digitally signed by Arvind Tulshiram Shete
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Housing Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=d33ed79e4d2d7921d0ca79b9de78ffaa75e5ff9801ced3d15f5ca38bf6aab62, serialNumber=822dcc750ffe36bfe50f258eb6574ffef985ca74e97243442a9c1b3323aaca40, cn=Arvind Tulshiram Shete
Date: 2022.06.03 10:59:08 +05'30'

**(अरविंद शेटे)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत :-**

१) मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
२) मा. सभापती / मा. उपसभापती विधान परिषद यांचे खाजगी सचिव, विधानभवन, मुंबई
३) मा. अध्यक्ष / मा. उपाध्यक्ष, विधानसभा यांचे खाजगी सचिव, विधानभवन, मुंबई
४) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
५) मा. उप मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
६) मा. विरोधी पक्षनेता, विधान परिषद यांचे खाजगी सचिव, विधानभवन, मुंबई
७) मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा यांचे खाजगी सचिव, विधानभवन, मुंबई
८) मा. मंत्री (गृहनिर्माण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
९) मा. राज्यमंत्री (गृहनिर्माण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
१०) मा. मंत्री व राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
११) मा. संसद सदस्य / मा. विधान परिषद सदस्य / मा. विधानसभा सदस्य (सर्व)
१२) मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
१३) प्रधान सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
१४) आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका
१५) उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई.
१६) मुख्य अधिकारी, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई.
१७) सर्व उप सचिव / सर्व अवर सचिव, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई
१८) संचालक, बी.डी.डी. चाळ, सावली इमारत, गणपत जाधव मार्ग, वरळी, मुंबई
१९) उप जिल्हाधिकारी (अति. /निष्का), कुलाबा विभाग /धारावी विभाग, मुंबई शहर, मुंबई
२०) उप जिल्हाधिकारी (अति. /निष्का), वांद्रे -२ विभाग, मुंबई उपनगर, मुंबई
२१) सर्व कार्यासने, गृहनिर्माण विभाग
२२) निवडनस्ती (गृनिप), गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई